मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 10 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत महिलाराज येणार?

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या एकूण 128 जागा : नगरसेविकांची संख्या 64 च्याही पुढे जाण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या एकूण 128 जागा आहेत. त्यापैकी निम्म्या जागा महिलांसाठी राखीव आहेत. खुल्या गटातून महिला निवडून आल्यास नगरसेविकांची संख्या 64 पेक्षा अधिक होणार आहे. त्यामुळे महापालिकेत महिलाराज येण्याची शक्यता आहे; तसेच महिलांच्या जागा खुल्या गटातील जागांच्या बरोबरीने असल्याने अनेकांची गोची झाली आहे. कुटुंबात पर्यायी योग्य महिला उमेदवार नसल्यास काहींना निवडणूक रिंगणातून माघार घेण्याची वेळ येऊ शकते

महापालिकेची निवडणूक जानेवारी 2026 ला होत आहे. महापालिकेच्या एकूण 128 जागांपैकी निम्म्या जागा महिलांसाठी राखीव आहेत; मात्र अनुसूचित जमाती (एस.टी) च्या तीनपैकी दोन जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जाती (एस.सी), इतर मागास वर्ग (ओबीसी), खुल्या (ओपन) गटात महिलांसाठी अर्ध्या जागा राखीव आहेत. त्यामुळे त्या जागांवर पुरूषांना लढता येत नाही. तसेच, एकूण 32 प्रभागांतील प्रत्येक प्रभागात दोन जागा या महिलांसाठी राखीव आहेत.

महिला आरक्षणामुळे अनेक पुरूष इच्छुकांची निवडणुकीची संधी हुकू शकते. प्रभागातील जागा न सुटल्यास तसेच, कुटुंबातील किंवा नात्यात सक्षम योग्य महिला उमेदवार नसल्यास त्यांना निवडणूक लढता येणार नाही. आजूबाजूच्या प्रभागात नशीब आजमावयाचे म्हटले तरी, मोठ्या प्रमाणात वाढलेल्या मतदार संख्येपर्यंत पोहण्यासाठी पुन्हा शून्यापासून सुरुवात करावी लागणार आहे. कमी कालावधीत प्रचार यंत्रणा राबविणे अवघड आहे. त्यासाठी भरमसाट खर्च पेलावा लागणार आहे. सर्व बाबी तपासल्यास निवडणूक रिंगणात माघार घेतल्याशिवाय पर्याय राहणार नाही, असे राजकीय क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. परिणामी, प्रभागात केलेला खर्च तसेच, केलेले काम वाया जाणार आहे. इच्छा नसतानाही इतर उमेदवारांचा प्रचार करण्याची वेळ येऊ शकते. अशा बिकट स्थितीमुळे काही इच्छुकांसमोर पेच निर्माण झाला आहे.

निवडणुकीत संधी हुकली तरी, इच्छुकांना महापालिकेच्या सभागृहात प्रवेश मिळू शकतो. त्यासाठी त्या पक्षाचे नगरसेवक संख्या अधिक असणे आवश्यक आहे. स्वीकृत नगरसेवक म्हणून पाचजणांना संधी मिळते. ते महापालिका सभेत तसेच, कामकाजात सहभागी होऊ शकतात. तसेच, सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयातही तब्बल 24 स्वीकृत सदस्य निवडले जातात. एका क्षेत्रीय कार्यालयात तीन स्वीकृत सदस्य असतात. तेथेही इच्छुकांना संधी मिळू शकते. अशा तऱ्हेने तब्बल 29 जणांना निवडणूक न लढता महापालिकेत प्रवेश मिळतो.




### खुल्या गटातून जिंकल्यास नगरसेविका संख्येत वाढ

» अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागास वर्ग (ओबीसी) आणि खुल्या (ओपन) गटातील खुल्या जागेवर महिला उमेदवारांना निवडणूक लढता येते. त्या जागेवर महिला निवडून आल्यास महापालिकेत नगरसेवकांपेक्षा नगरसेविकेची संख्या अधिक होणार आहे. नगरसेविकांची एकजूट असल्यास महापालिकेचा संपूर्ण कारभार नगरसेविकांच्या हाती जाण्याची शक्यता आहे.

### अराखीव जागेवर महिला लढू शकतात

» अराखीव गटात कोणीही उभे राहू शकतो. एससी, एसटी, ओबीसी आणि ओपन गटात महिलांसाठी एकूण 64 जागा राखीव आहेत. त्या जागेवर त्या वर्गातील महिलाच उभ्या राहू शकतात. मात्र, त्या-त्या वर्गातील महिला अराखीव जागेवरही निवडणूक लढवू शकतात, असे महापालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

---

# स्नेहा कलाटे यांच्या कार्य अहवालाचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते प्रकाशन

## स्नेहा कलाटे या गेल्या अनेक वर्षांपासून रणजीत आबा कलाटे फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य करीत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

स्नेहा रणजीत कलाटे यांच्या कार्य अहवालाचे चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न झाले. स्नेहा कलाटे या गेल्या अनेक वर्षांपासून रणजीत आबा कलाटे फाउंडेशनच्या माध्यमातून वाकड, कस्पटे वस्ती, विशाल नगर, जगताप डेअरी व पिंपळे निलख परिसरात सेवा आणि समर्पण भावनेतून सामाजिक कार्य करीत आहेत.

स्नेहा कलाटे यांचा परिचय कार्याचा, सेवा आणि समर्पणाच्या कार्य अहवालाचे प्रकाशन आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते झाले. प्रकाशन झाल्यानंतर आमदार शंकर जगताप यांनी कार्य अहवाल बारकाईने पाहत अनेक कार्यक्रमादरम्यानच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांची आठवण देखील झाली. अहवालाची मांडणी, रचना, रंगसंगती, प्रिंटिंग याचे देखील त्यांनी विशेष कौतुक केले.

मागील १२ वर्षे अविरतपणे नागरिकांच्या सुख दुःखात सहभागी होऊन स्नेहा कलाटे आणि त्यांचे कुटुंबीय तसेच फाउंडेशनचे सर्व सहकारी जनसेवेचे व्रत पुढे घेऊन जात आहेत. त्याचा संक्षिप्त स्वरूपातील हा कार्यअहवाल पाहताना, नक्कीच जनसामान्यांच्या सोबत फाउंडेशनच्या माध्यमातून असणारे ऋणानुबंध किती घट्ट आहेत याची जाणीव होते, आणि हि जाणीव नक्कीच जबाबदारी वाढवणारी देखील आहे असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले.



> "हा कार्यअहवाल लवकरच वाकड, कस्पटे वस्ती, विशाल नगर, जगताप डेअरी व पिंपळे निलख परिसरातील नागरिकांपर्यंत पोहोचेल. आजवर मिळालेले जनतेचे आशीर्वाद शुभेच्छा आणि मार्गदर्शन पुढील काळात माझ्यासोबत अखंड राहतील.
> - स्नेहा रणजीत कलाटे

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपची 'हायब्रीड' युती

## 'महापालिका निवडणुकीत महायुती व्हावी अशा मुख्यमंत्र्यांच्या सूचना आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

'महापालिका निवडणुकीत महायुती व्हावी अशा मुख्यमंत्र्यांच्या सूचना आहेत. महायुती न झाल्यास संकरित (हायब्रीड) युती करून लढले जाईल,' असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी सांगितले.पिंपरीमध्ये त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, विधानपरिषदेच्या आमदार उमा खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव यावेळी उपस्थित होते.

संकरित युतीची संकल्पना स्पष्ट करताना मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, 'पिंपरीतील ३२ पैकी २२ प्रभागांमध्ये युती झाली आणि उर्वरित दहा प्रभागांमध्ये युती झाली नाही, तर तेथे मैत्रीपूर्ण लढत होईल. शक्य नाही, तेथे स्वबळावर लढले जाईल. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत संपूर्ण युती होणे आवश्यक असते. पण, महापालिका निवडणुकीमध्ये पक्षासाठी राबणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय द्यायचा असतो. त्यामुळे अधिकाधिक ठिकाणी युती आणि उर्वरित ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल.'

शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनसंख्या विचारात घेऊन भविष्यात शहरामध्ये वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ नयेत, यासाठी आगामी १५ वर्षांचा विचार करून महापालिकेने नियोजन आराखडा तयार करावा. रस्त्यांवरील खड्ड्यांच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात यावे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा. पदपाथ अतिक्रमणमुक्त राहतील, यासाठी सुयोग्य नियोजन करावे, अशा सूचनाही पाटील यांनी दिल्या.

'महापालिका निवडणुकीत महायुती व्हावी अशा मुख्यमंत्र्यांच्या सूचना आहेत. महायुती न झाल्यास संकरित (हायब्रीड) युती करून लढले जाईल,' असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी सांगितले. काम करणाऱ्या, शहरातील प्रश्नांची जाण असणाऱ्या कार्यकर्त्यांना निवडणूक लढविण्याची संधी द्यावी. त्यांना निवडून आणावे, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी महापालिका निवडणूक प्रमुख, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे यांना दिल्या.



### तीन विधानसभा मतदारसंघात संघटनात्मक दौरा

» पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघाचा पाटील यांनी दौरा सुरु केला. शुक्रवारी त्यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचा संघटनात्मक आढावा घेतला. पिंपरी आणि भोसरी मतदारसंघाचा आढावा घेणार आहेत. यामध्ये महापालिका निवडणुकी बाबतीत अनेक सूचना त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या.

### 'रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवा'

» शहरातील रस्त्यांवर खड्डे मोठ्या प्रमाणात आहेत. त्याबाबतच्या तक्रारी सर्वाधिक आहेत. रस्त्यांवरील खड्डयांच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात यावे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा. पदपाथ अतिक्रमणमुक्त राहतील, यासाठी सुयोग्य नियोजन करावे, अशा सूचनाही पाटील यांनी दिल्या.

### 'वाहतूक नियोजनाचा आराखडा करा'

» शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनसंख्या विचारात घेऊन भविष्यात शहरामध्ये वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ नयेत, यासाठी आगामी १५ वर्षांचा विचार करून महापालिकेने नियोजन आराखडा तयार करावा. तत्काळ उपाययोजनांसाठी पोलीस विभागाशी समन्वय साधून वाहतूक नियंत्रक दिवे दुरुस्तीसह इतर उपाय योजण्यास प्राधान्य देण्याचे आदेशही पाटील यांनी दिले.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेला पुर्णवेळ आयुक्त मिळेना; कामकाज ठप्प

## महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे महापालिकेच्या आयुक्त पदाचा तात्पुरता पदभार देण्यात आला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तपदावरून शेखर सिंह यांची राज्य शासनाने बदली केली. त्यांच्याकडे नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी सोपविल्या नंतर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे महापालिकेच्या आयुक्त पदाचा तात्पुरता पदभार देण्यात आला आहे. परंतु, नवीन आयुक्त हे पूर्णवेळ देण्याचा निर्णय सरकारकडून लांबणीवर पडला आहे. त्याचा महापालिकेतील निवडणूक कामकाज व विकासकामांवर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे महापालिकेला पूर्णवेळ आयुक्त कधी मिळणार?, असा प्रश्न शहरवासीयांना पडला आहे.

शेखर सिंह यांची बदली झाल्यापासून महापालिकेत बदल्यांचे वारे वाहू लागले आहे. शेखर सिंह आयुक्त व प्रशासक असताना त्यांच्या कार्यकाळात झालेली कामे वादाचा विषय ठरली आहे. अनेक निविदांवर आरोप झाले आहेत. लवकरच निवडणूक होणार असून साडेतीन वर्षानंतर महापालिकेत नगरसेवकांची एन्ट्री होणार आहे. नगरसेवक व राजकीय पदाधिकारी आल्यानंतर मागील चुकीच्या कारभाराला तोंड द्यावे लागेल. या भितीने अनेकांनी महापालिकेकडून काढता पाय घेतला आहे. मात्र, इतर अधिका-याप्रमाणे महापालिकेला पूर्णवेळ आयुक्त देखील अद्याप मिळालेला नाही. नागपूरचे जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांच्या नावाची चर्चा असताना त्यांची नियुक्ती झालेली नाही.

श्रावण हर्डीकरांकडे पालिका आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार आहे. त्यात त्यांची बिहार निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून नेमणूक झालेली आहे. पालिकेला पूर्णवेळ आयुक्त नसल्यामुळे पालिकेचे कामकाज थंडावले आहे. प्रशासकीय प्रमुखपदाबाबत अनिश्चितता राहिल्यास याचा थेट परिणाम विकासकामांच्या गतीवर होऊ शकतो.

विशेषतः मेट्रो प्रकल्प, शहरातील वाहतूक समस्या, पाणीपुरवठा सुधारणा, कचरा व्यवस्थापन आणि स्मार्ट सिटी योजनांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी तात्पुरत्या नाही, तर स्थिर आयुक्तांची पालिकेला गरज आहे. तर, नवीन आयुक्तांची नेमणूक न झाल्यास हर्डीकरांकडेच पालिका निवडणूक होईपर्यंत पदभार राहण्याचीही शक्यता वर्तविली जात आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तपदावरून शेखर सिंह यांची राज्य शासनाने बदली केली. त्यांच्याकडे नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी सोपविल्या नंतर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे महापालिकेच्या आयुक्त पदाचा तात्पुरता पदभार देण्यात आला आहे.



### पालिकेचे कामकाज थंडावले

» श्रावण हर्डीकरांकडे पालिका आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार आहे. त्यात त्यांची बिहार निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून नेमणूक झालेली आहे. पालिकेला पूर्णवेळ आयुक्त नसल्यामुळे पालिकेचे कामकाज थंडावले आहे. प्रशासकीय प्रमुखपदाबाबत अनिश्चितता राहिल्यास याचा थेट परिणाम विकासकामांच्या गतीवर होऊ शकतो.

# खडकवासला पुलासाठी महापालिका करणार खर्च

## 60 वर्षे जुन्या पुलाची होणार दुरुस्ती ; या कामासाठी सुमारे अडीच कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणाच्या समोरील बाजूस असलेल्या तब्बल ६० वर्षे जुन्या उड्डाणपुलाची अखेर दुरुस्ती होणार आहे. या कामासाठी सुमारे अडीच कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार असून, त्यासाठीच्या निविदा महापालिका प्रशासनाकडून काढण्यात आल्या आहेत. कुंडमळा पूल दुर्घटनेनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार महापालिकेने या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले होते. त्यानंतर हा पूल असुरक्षित असल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांनी या पुलावरील जड वाहतूक बंद केली आहे.

त्यामुळे महापालिकेकडून आता या पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. पावसाळ्यात खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर मोठ्या प्रमाणात पर्यटक या पुलावर पाणी पाहण्यासाठी गर्दी करतात. तसेच, त्यांच्या वाहनांची पुलावर पार्किंग केली जाते. त्यामुळे पावसाळ्यात दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महापालिकेकडून हे काम हाती घेण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षात राज्यात पावसाळ्यात जुने पूल कोसळण्याच्या घटना घडल्या असून, त्यात अनेकांचा जीव गेला आहे. मागील वर्षी कुंडमळा परिसरातही जुना पूल कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी पर्यटन स्थळांवरील तसेच शहरातील जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. या तपासणीत, हा पूल पाटबंधारे विभागाच्या हद्दीत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने पानशेत धरण फुटल्यानंतर १९६५ मध्ये तो बांधला होता.

पावसाळ्यात तसेच वर्षभर खडकवासलाकडून वारजे, शिवणे, कुडजे तसेच पानशेतकडे जाणाऱ्या वाहनचालकांकडून या पुलाचा वापर केला जातो. पावसाळ्यात या परिसरात चार महिने मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी असते. मात्र, हा पूल दोन लेनचा असल्याने वाहनचालक पुलावर गाड्या उभ्या करतात, त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. तसेच दिवाळी आणि नवरात्रीच्या काळात या परिसरात आसपासच्या गावांतील नागरिक कपडे धुण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी या पुलाची दुरुस्ती अत्यावश्यक आहे.

मात्र, सध्या ही हद्द महापालिकेची असल्याने पूल धोकादायक असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याची दुरुस्ती करण्याच्या सूचना महापालिकेस देण्यात आल्या होत्या. त्यामुळे महापालिकेकडून या पुलाची दुरुस्ती पुढील पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे महापालिकेच्या प्रकल्प विभागाकडून सांगण्यात आले. खडकवासला धरणाच्या समोरील बाजूस असलेल्या तब्बल ६० वर्षे जुन्या उड्डाणपुलाची अखेर दुरुस्ती होणार आहे. या कामासाठी सुमारे अडीच कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार असून, त्यासाठीच्या निविदा महापालिका प्रशासनाकडून काढण्यात आल्या आहेत.




### महापालिकेकडून पुलाच्या दुरुस्तीचे काम

» महापालिकेकडून आता या पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. पावसाळ्यात खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर मोठ्या प्रमाणात पर्यटक या पुलावर पाणी पाहण्यासाठी गर्दी करतात. तसेच, त्यांच्या वाहनांची पुलावर पार्किंग केली जाते. त्यामुळे पावसाळ्यात दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महापालिकेकडून हे काम हाती घेण्यात आले आहे.

### पावसाळ्यात सर्वाधिक वापर..

» खडकवासला धरणापासून ते पानशेत धरणापर्यंत मुठा नदीला जोडणारा हा एकमेव पूल आहे. त्यामुळे पावसाळ्यात तसेच वर्षभर खडकवासलाकडून वारजे, शिवणे, कुडजे तसेच पानशेतकडे जाणाऱ्या वाहनचालकांकडून या पुलाचा वापर केला जातो. पावसाळ्यात या परिसरात चार महिने मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी असते. मात्र, हा पूल दोन लेनचा असल्याने वाहनचालक पुलावर गाड्या उभ्या करतात, त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. तसेच दिवाळी आणि नवरात्रीच्या काळात या परिसरात आसपासच्या गावांतील नागरिक कपडे धुण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी या पुलाची दुरुस्ती अत्यावश्यक आहे.

# चंद्रकांत पाटलांनी घेतले कुस्तीपटू सनी फुलमाळीचे पालकत्व

## उदरनिर्वाहासाठी दरमहा पगारातून देणार 50 हजार रुपये, आशियाई क्रीडा स्पर्धेत सनी फुलमाळीने भारतासाठी सुवर्णपदक कमवले.

**पुणे | प्रतिनिधी**

घरची परिस्थिती बिकट असूनही जिद्द,चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर बहरिन येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सनी फुलमाळीने भारतासाठी सुवर्णपदक कमवले. यामुळे त्याचं आयुष्यच पालटलं आहे. लोहगावमधील पालावर राहून कुस्तीमध्ये सुवर्ण कामगिरी करणाऱ्या सनीचे पालकत्व राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतले. लोकसहभागातून घर आणि सरावासाठी तालीम, शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत आणि स्वतःच्या पगारातून दरमहा ५० हजार रुपये देण्याची घोषणा पाटील यांनी केली.

सनी आणि त्याच्या कुटुंबाची लोहगावमधील पालावर जाऊन चंद्रकांत पाटील यांनी भेट घेतली आणि अभिनंदन करुन त्याच्या कामगिरीचे कौतुक केले. यावेळी सनीचे प्रशिक्षक वस्ताद सदाशिव राखपसरे, भाजपा क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीप भोंडवे, माजी नगरसेवक बॉबी टिंगरे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले, जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या बळावर सनीने मिळवलेले यश हे अतिशय कौतुकास्पद आहे. त्याने आपल्या कामगिरीने आई वडिलांचं नाव काढलं आहे. डोक्यावर छप्पर नसतानाही पालावर राहून त्याने ही कामगिरी केली. सनीला लोकसहभागातून घर आणि कुस्तीच्या सरावासाठी तालीम बांधून देणार आहे. त्यासोबतच शिक्षणासाठीही सर्वतोपरी मदत करणार असून, माझ्या आणि पत्नीच्या उत्पन्नातून उदरनिर्वाहासाठी दरमहा ५० हजार रुपये देणार असल्याचं त्यांनी सांगितले.



### मुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करणार

» शिक्षण पूर्ण करण्यासोबतच सनी याने कुस्तीकडेदेखील लक्ष केंद्रित करावे. ऑलिम्पिकमध्येही सुवर्ण कामगिरी करावी, तसेच आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करुन पदक मिळवणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात यापूर्वीच निर्णय झालेला असून, राज्यभरातील असंख्य खेळाडूंना त्याचा लाभ झालेला आहे. मात्र सदर निर्णय हा १७ वर्षांवरील खेळाडूंना लागू आहे. त्यामुळे सनीच्या निमित्ताने १७ वर्षांखालील खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

# तळेगाव ठरवणार 'गणाचा राजा', पण अंतर्गत गटबाजीमुळे एकीला सुरुंग

## शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे पंचायत समिती गण आगामी निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेला गण ठरत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे पंचायत समिती गण आगामी निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेला गण ठरत आहे. या गणात एकूण सुमारे २६ हजार मतदार असून, त्यापैकी तब्बल १३ हजार मतदार केवळ तळेगाव ढमढेरे गावातील आहेत. म्हणजेच अर्ध्याहून अधिक मतदान तळेगावच्या हाती आहे. त्यामुळे या गणाचे भविष्य तळेगावच ठरवणार हे स्पष्ट झाले असले तरी, गावातील गटबाजीमुळे मतदान विभागले जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, निवडणुका पुढे ढकलल्याने येथील राजकीय वातावरण तात्पुरते शांत झाले आहे.गटातील एकूण मतदानाच्या जवळपास ६०% म्हणजे तब्बल १५ हजारांहून अधिक मतदार एकट्या तळेगावातून आहे. पण या गावातून यंदा जिल्हा परिषदेसाठी एकही इच्छुक उमेदवार नसणे हे चिंतनास कारणीभूत ठरत आहे. गावातल्या गावात गटबाजीआणि खेकडा प्रवृत्तीमुळे हे इच्छुक उमेदवार नसण्याचे कारण असल्याचे बोलले जात आहे.

गावचे नेते व कार्यकर्ते पक्षनिष्ठा आणि गटबाजीमध्ये इतके गुंतले की, त्यांनी गावातील उमेदवारांना पाठबळ देण्याऐवजी गावाची एकजूट ढासळवली. यामुळे मतदारांमध्ये नाराजी असून, नेतृत्वावरील विश्वास डळमळीत झाला आहे. त्यामुळे बहुतांश इच्छुक पंचायत समितीकडे वळत आहेत.

जिल्हा परिषद गटात तळेगाव ढमढेरेसह इतर पाच-सहा गावांचा समावेश आहे. जिल्हा परिषद जागेसाठी त्या गावांतूनही इच्छुक आहेत. त्यामुळे पंचायत समितीसाठी सर्वच पक्ष तळेगावातला उमेदवार असावा की, बाहेरचा? या द्विधा मनःस्थितीत आहेत. जर तळेगाव ढमढेरेने एकमताने उमेदवार ठरवले, तर त्या उमेदवाराचा विजय जवळजवळ निश्चित आहे.

शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे पंचायत समिती गण आगामी निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेला गण ठरत आहे. या गणात एकूण सुमारे २६ हजार मतदार असून, त्यापैकी तब्बल १३ हजार मतदार केवळ तळेगाव ढमढेरे गावातील आहेत. राजकीय जाणकारांनुसार, या गणातील सर्वात मोठी ताकद म्हणजे तळेगावचे मतदान. हे मतदान जर एखाद्या उमेदवाराच्या बाजूने एकत्र आले, तर तो निकालाला हवे तेवढे वळण देऊ शकतो.



### गावात राजकीय तापमान वाढले..

» गावातील माजी सदस्य, माजी सरपंच, सोसायटीचे संचालक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींना वेग आला आहे. काही जण पक्षीय राजकारणापेक्षा 'गावाच्या हिताचा' विचार करून एकत्र येण्याची चाचपणी करत आहेत, तर काही नेते आपले वर्चस्व टिकवण्यासाठी स्वबळावर उमेदवारीसाठी तयारी करत आहेत.

### गटागटातून हालचाली सुरू

» पंचायत समिती सदस्यपदासाठी सध्या भाजप, राष्ट्रवादी (शरद पवार गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) आणि काँग्रेस या प्रमुख पक्षांत हालचाली जोरात सुरू आहेत. प्रत्येक पक्षाकडून 'गावातून कोणाला पुढे करायचे? या प्रश्नावर पडद्यामागे चर्चा सुरू आहे. भाजपकडून माजी सदस्य इच्छुक आहेत, तर राष्ट्रवादी शरद पवार गट व अजित पवार गट जुन्या चेहऱ्याला पुन्हा संधी देण्याच्या तयारीत आहेत. शिवसेना शिंदे गट तरुण चेहऱ्याला उमेदवारी देण्याची शक्यता आहे.

### गटबाजी आणि अंतर्गत ताणतणाव

» तळेगाव ढमढेरे हे राजकीयदृष्ट्या पुढारलेले गाव असले तरी, येथे गटबाजी आणि अंतर्गत मतभेद वाढलेले दिसतात. दोन-तीन स्थानिक गट आपापल्या नेत्यांच्या निष्ठेनुसार स्वतंत्र हालचाली करत आहेत. यामुळेच मतदान विभागले जाऊ शकते. गावात एकी रहाणे, निर्णायक ठरणार आहे.

# "बिबट्या वाचवा... पण आम्हालाही जगू द्या" ; बिबट्या-मानव संघर्षाने शिरूर तालुक्यात आक्रोश

## शिरूर तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्या-मानव संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**


शिरूर तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्या-मानव संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत. पिंपरखेड, जांबूत, टाकळी हाजी, फाकटे, कवठे येमाई या परिसरामध्ये गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांच्या हल्ल्यांत मोठी वाढ झाली आहे. पशुधन, लहान मुले आणि माणसांवर हल्ल्यांच्या घटना रोज घडत असताना, वनविभागाने दिलेल्या 'कंपाऊंड करा', 'गटाने काम करा', 'टॉर्च वापरा' अशा सूचना शेतकऱ्यांच्या जगण्याच्या वास्तवाशी विसंगत ठरत आहेत.

वनविभागाने बिबटे पकडण्यासाठी ठोस उपाययोजना न केल्यामुळे शेकडो बिबटे या भागात दिवसाढवळ्या फिरत असून नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. पिंपरखेड येथे नरभक्षक बिबट्या मारला असल्याचे खोटे दाखवून वनविभागाने आपली पाठ थोपटून घेतली, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.शेतकऱ्यांचा सवाल थेट आहे; औषध फवारणी, गवत काढणे अशा सर्व शेतीच्या कामांसाठी वाकावेच लागते.

मग 'वाकू नका' म्हणणाऱ्यांना आमचं काम समजतं का? घरात पुरेसे लोक नसताना 'गटाने काम करा' ही सूचना व्यवहार्यता आहे का?"गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, शासन आणि वनविभागाने फक्त सूचना न देता, प्रत्यक्ष कार्यवाही आणि ठोस उपाययोजना राबवाव्यात. शेतकरी हा देशाचा आर्थिक कणा आहे. जर तोच भीतीने वाकला, तर देशाचा कणा मोडेल.

रानात मेंढ्यांसह फिरणाऱ्या धनगर समाजाला दररोज वेगवेगळ्या ठिकाणी तळ ठोकावा लागतो. रानात कुंपण कसं घालायचं? रोज सुरक्षा व्यवस्था कशी करायची? असा प्रश्न त्यांच्याकडून विचारला जात आहे. बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे मोठे नुकसान सोसावे लागत असल्याने काही कुटुंबांनी रात्रीच्या वेळी मेंढ्या एका ठिकाणी एकवटणेच बंद केले आहे.

गेल्या काही काळात बिबट्यांच्या हल्ल्यांत दोन निष्पाप मुलांचे जीव गेले, ही सर्वात भीषण बाब ठरली आहे. पालकांच्या डोळ्यात आजही अश्रू आहेत. "आर्थिक मदत नको... आमची मुलं परत द्या!" असा त्यांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा आहे.



### टॉर्च, काठी आणि गाण्यांच्या सूचना अवास्तव..

» वनविभागाकडून रात्री टॉर्च वापरणे, गाण्यांचा आवाज करणे, हातात काठी ठेवणे अशा उपायांचा समावेश आहे. मात्र, "हातात काठी घेऊन शेतात काम कसे करायचे आणि दिवसा शेतात काम करताना काय करायचं," असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. या सूचना केवळ कागदावरील उपाय असून ग्रामीण वास्तव, शेतमजुरीची पद्धत आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेतलेली नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.